# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली— ४४२६०५

फोन/फॅक्सनंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुलका/६९८५/२०१८ दिनांक :२५/०९/२०१८

## जाहिर सुचना

**नविन महाविद्यालय,विविध अभ्यासक्रम आदीसाठी विद्यापीठाकडून अर्ज आमंत्रित**

**अर्ज सादर करण्यासाठी ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत मुदत**

महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनीयम २०१६, नुसार शैक्षणिक सत्र २०१९—२० करिता नविन महाविद्यालय, नविन अभ्यास पाठयक्रम, नविन विद्याशाखा, विषय, अतिरीक्त तुकडी सुरू करण्याकरीता संस्था/महाविद्यालयांकडुन प्रस्ताव मागविण्यात आले असून विहीत नमून्यात दि. ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत सदर अर्ज विद्यापीठात सादर करावयाचे आहेत.

वित्त व लेखा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या ठिकाणी बृहत आराखडा प्रत व संबंधित अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. बृहत आराखडा रूपये १०५०/— व नविन महाविद्यालय, नविन अभ्यास पाठयक्रम, नविन विद्याशाखा, विषय, अतिरीक्त तुकडीकरीता प्रक्रिया शुल्क रूपये १०००/— असे शुल्क निश्चित करण्यात आले आहे. विद्यापीठाचे संकेतस्थळ **unigug.org** वर मार्गदर्शक सुचना उपलब्ध करून दिलेल्या आहेत, त्यानुसारच अर्ज **Hard** व **Soft** कॉपीमध्ये सहा प्रतित विद्यापीठाला सादर करावा.

महाराष्ट्र शासनाने २०१९—२० वर्षाकरीता बृहत आराखडा मंजुर केला असून त्यामध्ये २९ लोकेशन नमूद केले आहेत. तसेच गोंडवाना विद्यापीठा परिक्षेत्रा अंतर्गत भविष्यात सुरू होणाऱ्या उद्योगाला व स्थानिक क्षेत्राला लागणारी मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता कौशल्य विकासावर आधारीत ४७ नवीन अभ्यासक्रम बृहत आराखडयात प्रस्तावित केलेले आहे.

सर्व संबधिताच्या माहितीकरीता कळविण्यात येते की, अर्जासोबत भरावयाचे प्रस्ताव शुल्क विद्यापीठाने विहित केल्यानुसार वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नावे धनाकर्ष **(Demand Draft)** काढून विद्यापीठ खाती जमा करावयाचे आहेत. अर्ज शुल्क व इतर बाबींसाठी काही अडचणी असल्यास विद्यापीठ विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे दुरध्वनी क्र. ०७१३२—२२३३२४ यावर संपर्क साधता येईल.

विहित पध्दतीने तसेच शुल्क न भरता सादर केलेले याशिवाय त्रृटीयुक्त असलेल्या अर्जाची शासनाकडे शिफारस न करता संबधितांना परत करण्यात येईल. सर्व संबधितांनी अर्ज सादर करतांना सुचनांचे पालन करून विहित मुदतीत अर्ज विद्यापीठाला सादर करावेत, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ.ईश्वर एस. मोहुर्ले यांनी केले आहे.

डॉ.ईश्वर एस.मोहुर्ले
कुलसचिव(प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

कुलसचिव
गोंडवाना वि... गडचिरोली